वेळ : 2 तास | पूर्व परीक्षा (सराव पेपर) - 2 (2022-23) | एकूण गुण : 40

सूचना : 1. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
2. प्रश्न क्रमांक 4 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या भारत/ब्राझील नकाशा-आराखडयाचा वापर करून तो उत्तपत्रिकेस जोडावा.
4. प्रश्न क्रमांक 6 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी उत्तपत्रिकेस जोडावी.
5. प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.
6. उजकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवतात.
7. प्रश्नांची उत्तरे केवळ निळया किंवा काळया पेनाने लिहावीत.

**प्र 1. अचूक सहसंबध ओळखा व साखळी बनवा :** **4**

| गट 'अ' | गट 'ब' | गट 'क |
|---|---|---|
| 1) गंगा नदी | i) पाऊ ब्रासील | a) बाष्पी भवनाने पाणी कमी होऊ नये म्हणून वनस्पतीची पाने गळतात |
| 2) ॲमेझॉन नदी | ii) मुखापाशी गाळ जमा होतो | b) मुखापाशी बेटे तयार होतात |
| 3) ब्राझील | iii) सागवान झाडे | c) वृक्षाच्या नावाने देशाचे नाव |
| 4) पानझडी वने | iv) मुखापाशी गाळ जमा होत नाही | d) नदयांच्या मुखापाशी अनेक वितरिका आढळतात |

Genius JEE NEET CET FOUNDATION Institute

**प्र 2. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा :** **4**

1) गंगा-ब्रम्हपुत्रा प्रणालीच्या त्रिभुज प्रदेश त्रिभूज प्रदेशाला ............ म्हणतात.
अ) ओरॅान ब) प्रयाग क) सिंध ड) सुंदरबन

2) अरवली पर्वताच्या पायथ्याशी ............... पठार आहे.
अ) मेवाड ब) माळवा क) बुंदेलखंड ड) दख्खन

3) ब्राझील या देशात लोकसंख्येची सरासरी घनता ............... व्यक्ती प्रति चौकिमी एवढी आहे.
अ) 23 ब) 29 क) 32 ड) 42

4) ............... च्या दलदलीच्या प्रदेशात एकशिंगी गेंडा आढळतो.
अ) महाराष्ट्र ब) तमिलनाडू क) आसाम ड) केरळ

**प्र 3. खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा : (कोणतेही चार)** **4**

1) ब्राझीलच्या वायव्ये कडून आग्नेयेकडे जाताना आढळणाऱ्या प्राकृतिक रचनेचा क्रम -
अ) पॅराना नदी खोरे-गियाना उच्चभूमी-ब्राझील उच्चभूमी ब) गियाना उच्चभूमी-ॲमेझॉन खोरे-ब्राझील उच्चभूमी
क) किनारपट्टीचा प्रदेश-ॲमेझॉन खोरे-ब्राझील उच्चभूमी

2) ब्राझीलमधील पर्जन्यछायेचा प्रदेश -
अ) पंपास ब) उत्तरेकडील उच्चभूमी क) ॲमेझॉन नदीचे खोरे

3) ब्राझीलमधील कमी नागरीकरण झालेले राज्य -
अ) पारा   ब) पॅराना   क) आमापा

4) या वनांतील वृक्षांची पाने रुंद व हिरवीगार असतात -
अ) पानझडीची वने   ब) सदाहरित वने   क) हिमालयीन वने

5) भारतातील दक्षिण-पूर्व वाहणा-या नदया -
अ) सतलज-चिनाव-वियास   ब) गंगा-यमुना-गोमती   क) कावेरी-कृष्णा-गोदावरी

**प्र 4. (अ) तुम्हाला पुरवलेल्या भारताच्या नकाशा आराखडयात पुढील घटक दाखवा तसेच त्यांची नावे व चिन्हांची सूची तयार करा : (कोणतेही चार)** **4**

(1) पश्चिम बंगाल   (2) कर्कवृत्त
(3) कारिकाल   (4) दिल्ली
(5) इंदिरा पॉइंट   (6) हिमाचल प्रदेश

**प्र 4. (आ) पुढील भारताच्या नकाशाचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (कोणतेही चार)** **4**




**प्रश्न :**

1) ब्राझीलमधील सर्वात मोठे नदीचे खोरे कोणते आहे?

2) पॅराग्वे नदी कोणत्या दिशेने वाहते?

3) साओ फ्रान्सिस्को नदी कोणत्या महासागराला मिळते?

4) मराजो बेट कोणत्या नदीच्या मुखाजवळ आहे?

5) उत्तरेकडे वाहणा-या कोणत्याही दोन नद्यांची नावे लिहा?

**प्र. 5. पुढील विधानांची भौगोलिक कारणे लिहा : (कोणतेही दोन)** **6**

1) ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात लोकसंख्येचे वितरण विरळ आहे.

2) देशाच्या सर्वांगीण विकासासाठी वाहतुकीचा विकास उपयुक्त आहे.

3) क्षेत्रभेटीदरम्यान निर्माण होणा–या कच–याचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे.

4) ब्राझीलमध्ये कृमी कीटकांची संख्या जास्त आहे.

**प्र 6. (अ) पुढील सांख्यिकीय माहितीच्या रेषालेख काढा व पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

परदेशी पर्यटकांची संख्या (लक्ष)

| देश/वर्ष | 1995 | 2000 | 2005 | 2010 | 2015 |
|---|---|---|---|---|---|
| **ब्राझील** | 20 | 50 | 45 | 40 | 50 |
| **भारत** | 20 | 21 | 30 | 50 | 140 |

**प्रश्न :**

1) कोणत्या वर्षी पर्यटकांची संख्या सर्वाधिक आहे?

2) 2000 मध्ये, किती पर्यटकांनी ब्राझीलला भेट दिली?

3) कोणत्या वर्षी भारत आणि ब्राझीलमध्ये आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या समान आहे?

**किंवा**

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

**प्र 6. (आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

**प्रश्न :**

1) प्राथमिक व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी कोणत्या देशात जास्त आहे?

2) स्थूल अंतर्देशीय उत्पादनात कोणत्या देशात तृतीयक व्यवसायांचे योगदान अधिक आहे?

3) स्थूल अंतर्देशीय उत्पादनात द्वितीयक व्यवसायांचा हिस्सा कोणत्या देशात जास्त आहे?

4) भारताप्रमाणे ब्राझीलची अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे, असे म्हणता येईल का ते सकारण सांगा.

5) ब्राझीलमधील द्वितीय क्षेत्रात गुतंलेल्या लोकांची टक्केवारी किती आहे?

6) कोणत्या देशात फक्त 10% लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात गुंतलेली आहे?




**प्र 7. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** **8**

1) मानवी वस्त्यांची वाढ विशिष्ट स्थानीच झालेली का आढळते?

2) ब्राझीलच्या हवामानावर परिणाम करणारे घटक लिहा.

3) आधुनिक संदेशवहन यावर सविस्तर टीप लिहा.